नि .फौ.ख.क्र.३०/२०१७



सरकार वि. क्रिष्णा

नि.क्र. ९

सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव श्रीकृष्ण लक्ष्मण गडकरी

वय ६२ वर्ष सेवानिवृत्ती

राहणार - नागपूर.

<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा</u>

मी आरोपी श्रीकृष्ण व इतर आरोपींना ओळखतो. सन २०१६ मध्ये मी अल्टाटेक सिंमेंट कंपनी तारसा येथे हयुमन रिसोर्स ऑफीसर या पदावर कार्यरत होतो. घटना ही दिनांक १९.१०.२०१६ रोजी घडली होती. त्यादिवशी सेक्युरिटी शिफ्ट इनचार्ज यांनी दिनांक १९.१०.२०१६ चे मध्यरात्री दोन ते तिन वाजताच्या सुमारास फोन करुन कंपनीमध्ये कॉपर वायर व कॉपर केबल अंदाजे १०० किलो चोरी झाल्याचे सांगितले. तसेच त्यांनी सांगितले कि चोर कृष्णा सातपुते याला त्याने पकडुन ठेवले आहे. तो मुद्येमाल त्यावेळी अंदाजे ८० ते ८५ हजार रुपये रकमेचा होता. मी नागपुर येथे राहत असल्याने त्वरित तेथुन निघालो व कपंनीमध्ये सकाळी चार ते सव्वा चार वाजताचे सुमारास पोहोचलो. तेव्हा मंगलसिंग याने पकडुन ठेवलेल्या चोरास माझे ऑफीसमध्ये आणले. त्या चोरास विचारपूस केली असता त्याने चोरी केल्याचे कबुल केले व त्याचेसोबत इतर दोन साथीदार असल्याचे सांगितले. त्यामुळे मी पोलीस स्टेशन मौदा येथे गेलो व फिर्याद दाखल केली. आता मला ती फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही असुन मजकुर बरोबर आहे. करिता फिर्यादला **<u>निशानी क्रमांक १०</u>** देण्यात येते. आता मला प्रथम खबर दाखविली. त्यावर माझी सही असुन मजकुर बरोबर आहे. करिता प्रथम खबरीस **<u>निशानी क्रमांक ११</u>** देण्यात येते. पोलीसांनी कंपनीमध्ये येवुन मला विचारपुस केली होती व चोरीचा माल पकडल्याबाबतचा पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही असुन मजकुर बरोबर आहे. करिता जप्ती पंचनाम्यास **<u>निशानी क्रमांक १२</u>** देण्यात येतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीचे ॲड. श्रीमती आर यु ढोणे यांचे द्वारे</u>**

मी त्या कंपनीमध्ये सन २०१९ पर्यंत नौकरीस होतो. त्यानंतर सेवानिवृत्त झालो. माझे वरिष्ठ अधिकारी त्यावेळी ग्राईंडीग युनिट हेड सुरेशकुमार राउत हे होते. हे म्हणणे खरे आहे की कंपनीचे सेक्युरिटी गार्ड संबधी काम माझेकडे होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपी सोनु आणि अमन आमचे कंपनीतच कामास होते. हे म्हणणे खरे आहे की कंपनीमध्ये रात्रपाळीचे इतर कर्मचारी सुध्द असतात. हे म्हणणे खरे आहे की मंगलसिंग हा आमचे कंपनीतच कामावर होता. हे म्हणणे खरे आहे की कंपनीमध्ये येणा-या व जाणा-या मालाचे आवक जावक रजिस्टर असते व कंपनीमध्ये येणा-या व कंपनीतुन जाणा-या मालाचे त्यात नोंद होते. हे म्हणणे खरे आहे की कंपनीमध्ये घडणा-या घटनांची माहीती मंगलसिंग मला देत असे. हे म्हणणे खरे आहे की मंगलसिंग माझे कंपनीतील कर्मचारी असल्याने त्याचेसोबत माझे चांगले बोलणे चालणे होते.

**प्रश्न** - कंपनीत येणा-या जाणा-या मालाचे आवक जावक रजिस्टर तुम्ही पोलीसांना फिर्याद देतेवेळी दिले होते काय ?

**उत्तर** - मी पोलीसांना चोरी गेलेल्या मालाची इनव्हाईस दिली होती.

हे म्हणणे खरे नाही की मंगलसिंग हा कंपनीत येणारा माल माझे मदतीने भंगारात विकत असे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्रमांक २ व ३ हे आमचे कडेच काम करत होते व त्यांना भंगारात माल विक्रीबाबत माहीती होती. चोरी झालेल्या मालाची फिर्याद दिल्याबाबत मी माझे वरिष्ठांना सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की मी व मंगलसिंग भंगारात कंपनीचा माल विकत असल्याबाबत आरोपी क्रमांक २ व ३ यांनी माझे वरिष्ठांना तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की मंगलसिंग याचे सांगण्यावरुन मी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की प्रत्यक्षात काय घडले ते मला माहित नाही. माझेकडे घटनेच्या वेळी दुचाकी वाहन होते. आमचे कंपनीपासुन मौदा येथे येण्यास अंदाजे अर्धा तास वेळ लागतो. आमचे कंपनीत असलेले नंदकिशोर आगाशे, नवनीत गायकवाड, खेमराज शेंडे हे कंत्राटदाराद्वारे हे नेमलेले सेक्युरिटी गार्ड आहेत. हे म्हणणे

खरे आहे की त्यांचे सोबत देखील माझे चांगले बोलणे चालणे होते. हे म्हणणे खरे नाही की मी घटनेच्या वेळी अल्ट्राटेक सिमेंट कंपनी, तारसा येथे नौकरीस होतो व दिनांक १९.१०.२०१६ रोजी मध्यरात्री आमचे कंपनीतील कॉपरचे वायर व कॉपर केबल अंदाजे १०० किलो चोरी झाल्याची माहीती व चोरास पकडुन ठेवल्याची माहीती मला मंगलसिंग या सेक्युरिटी गार्डने फोन करुन सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की तो मुद्येमला अंदाजे ८० ते ८५ हजार रुपये रकमेचा होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मला माहीती मिळाल्यावर मी त्वरित कंपनीत जाण्यास निघालो व तेथे सकाळी चार ते सव्वा चार च्या सुमारास पोहोचलो तेव्हा मंगलसिंग याने पकडुन ठेवलेल्या चोरास माझे ऑफीसमध्ये आणले, त्या चोरास विचारपुस केली असता त्याने चोरी केल्याचे मान्य केले व त्याचे सोबत इतर दोन साथीदार असल्याचे त्याने सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की जप्ती पंचनामा निशानी क्रमांक १२ पोलीसांनी पोलीस स्टेशन येथेच केला होता. हे म्हणणे खरे नाही की तो पंचनामा पोलीसांनी स्वतःचे मनाने तयार करुन मला केवळ सही करण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की आरोपींना फसविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही. श्रवणोत्तर स्वीकृत

मौदा.

दिनांक २७.१०.२०२१

(एस.पी वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा